दिनांक 31/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.160

विषय – विटा नगरपरिषदेच्या कायम आस्थापनेवरील कर्मचा-यांना सन 2023- 2024 या वित्तीय वर्षा करिता दीपावली सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी सहा.कार्यालय अधिक्षक यांची दिनांक 20/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत / कर्मचारी / संवर्ग कर्मचारी संघटना यांचेकडील 11/10/2023 रोजीचे पत्र.

विटा नगरपरिषद कर्मचारी संघटना यांनी दिनांक 11/10/2023 ने अर्ज दाखल करून सन 2023-2024 सालाकरिता प्रती कर्मचारी र.रू. 25,000/- प्रमाणे सानुग्रह अनुदान मिळणे बाबत विनंती केली आहे.

मा.उपसंचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे सोबत कर्मचारी संघटनेच्या पदाधिका-यासोबत दिनांक 30/5/2008 रोजीच्या बैठकीमधील निर्णयानुसार मुद्दा क्रमांक 2 ने नगरपरिषद कर्मचा-यांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदान देणेबाबत नगरपरिषदानी त्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन नगरपरिषद कर्मच्या-यांना सानुग्रह अनुदान देणबाबत विचार करावा असे सूचित केले आहे. कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान(बोनस) देणे कामी सन 2023- 2024 च्या नगरपरिषद बजेट मध्ये 23,00,000/- इतक्या रकमेची तरतूद आहे.

गतवर्षी नगरपरिषद कर्मचारी संघटनेच्या मागणीनुसार व मा.कौन्सिलच्या मंजूरीनुसार नगरपरिषदेच्या कायम आस्थापनेवरील कर्मचा-यांना प्रत्येकी रक्कम रुपये 16,000/- प्रमाणे इतकी रक्कम अदा करणेत आलेली होती. तरी दरवर्षी प्रमाणे यावर्षीही विटा नगरपरिषदेच्या कायम आस्थापनेवरील कर्मचा-यांना र.रू.18,000/- सानुग्रह अनुदान ( बोनस ) प्रदान करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 31/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.161

विषय - विटा नगरपरिषदेच्या सर्वर रूममध्ये 1 टनाचा AC बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 30/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेच्या सर्वर रूम मधील AC नादुरुस्त असून तेथे नवीन 1 टनाचा AC बसविणे अत्यावश्यक आहे. सर्वर रूम मध्ये AC नसल्या कारणाने सर्वर वारंवार बंद पडत असून सर्व विभागांना कामकाज करणेस अडचणीचे होत आहे. तरी सदर रुममध्ये AC बसविल्यास कुलिंग इफेक्टमुळे सदर समस्या दूर होईल. या कामी एकूण 60 हजार रुपये पर्यंत खर्च अपेक्षित आहे. तरी विटा नगरपरिषदेच्या सर्वर रूममध्ये 1 टनाचा AC GeM पोर्टल वरुन खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक  31/10/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.162

विषय  :-  महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत भुयारी गटर योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करणे बाबत निर्णय घेणे.

संदर्भ :- 1) मा.मुख्याधिकारी सो, यांनी पा.पु.ज.नि.व स्वच्छता अभियंता यांची दि.30/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) दि.03/10/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.144.

3) या कार्यालयामार्फत जा.क्र.1667 दि.04/09/2023 ने मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग सांगली यांना सादर केलेला प्रस्ताव

4) मा.मुख्य अभियंता,पुणे यांचे तांत्रिक मान्यतेचे पत्र जा.क्र.मु.अ (पुणे)/तांशा-3/ सु.ज.नगरो/विटा भूगयो 2621 दि.27/10/2023

नगरपरिषद हद्दीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत भुयारी गटर योजना कार्यान्वीत करणे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक संदर्भ क्र.4 अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी र.रू.78,47,74,000/- यास दि.27/10/2023 रोजी तांत्रिक मंजूरी दिलेली आहे. सदरचा प्रस्ताव नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करणेस मंजूरी देत आहे. सदर योजनेकामी नगरपरिषद स्वनिधीचा हिस्सा नगरपरिषद फंडातून किंवा शासनाकडील 15 वा वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातून अगर शासनाकडील इतर अनुदान  / व्याजाचे रक्कमेमधून जमा करणेस मंजूरी देत आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत भुयारी गटर योजना शासन निर्णयनुसार सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार प्रकल्प मंजूरीकरिता खालील अटी शर्ती मान्य आहेत.

*  बंधनकारक सुधारणा

1) प्रकल्प मंजूरीच्या पहिल्या वर्षात नगरपरिषद यांच्या कामकाजाचे पुर्ण संगणकीय करणे अनिवार्य राहिल यात प्रामुख्याने ई गव्हर्नन्स, लेखा, जन्म-मृत्यू नोंद सुधारण्याची 100 टक्के अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

2) उचित उपभोक्ता कर लागू करून किमान 80 टक्के वसूल करणे.

3) नागरी क्षेत्रातील गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतूद करणे.

4) स्थानिक स्वराज्य संस्थेने द्विलेखा नोंद पध्दती सहा महिन्यात पुर्ण करणे.

5) स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या क्षेत्रातील मालमत्ता कराचे पुर्नमुल्यांकन करणे.

6) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम 2000 च्या तरतुदीनुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन करणे.

पान नं. 2 वर

7) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्याचे क्षेत्रातील मालमत्ता कराची व पाणीपट्टीची वसूली पहिल्या वर्षी किमान 80 टक्के करणे बंधनकारक राहिल. त्यापुढील वर्षात सदर वसूली उर्वरित 90 टक्के या प्रमाणात करणे.

8) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या मालकीच्या इमारतीवर पर्जन्यजल संचय करावे.

9) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.

10) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात ऊर्जा बचतीच्या उपाययोजना राबविणे.

वरील प्रमाणे बंधनकारक सुधारणा नगरपरिषद राबविणेस तयार आहे.

* वैकल्पीक सुधारणा

1) मलनिस्सारण प्रकल्प हाती घेतलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरी भागातील सांडपाण्याचे पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर करण्याबाबतच्या घटकांचा समावेश त्यांच्या सविस्तरप्रकल्प अहवालामध्ये करावा.

2) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या मालकीच्या इमारतीवर पर्जन्यजल संचय करावे.

3) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने नियमीत जल लेखापरिक्षण (वॉटर ऑडीट) करणे.

वरीलप्रमाणे वैयक्तिक सुधारणा नगरपरिषद राबवित आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना शासन निर्णय नुसार सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार प्रकल्प मंजूरी करीता इतर खालील अटी शर्ती मान्य आहेत.

1) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सुधारीत वित्तीय आकृतीबंधाच्या प्रमाणानुसार देय होणारा त्यांचा हिस्सा योजनेसाठी उघडलेले स्वतंत्र खातेमध्ये प्रथम जमा करणे आवश्यक राहील.

2) सदर योजनेच्या मंजूर प्रकल्पाचे शासकीय, निमशासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाचे गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे.

3) या योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय नोडल यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्था यांचा द्विपक्षीय सामंजस करार करणे बंधनकारक राहील.

4) मंजूर प्रकल्प पुर्णत्वास गेल्यानंतर सदर योजनेची देखभाल व दुरूस्ती करणेची जबाबदारी नागरी स्थानिक संस्थेची राहील.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत शासनाकडील ज्या काही शर्ती व अटी असतील याचे पालन करणेस नगरपरिषद तयार आहे. याकामी आवश्यक ती पुढील नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद,विटा